**निर्धारीत वेळेत पदोन्नतीच्या प्रस्तावावर कार्यवाही होणेच्या दृष्टीने कार्यपध्दती.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
परिपत्रक क्रमांक :- नपप्रस/२०२२/सर्व न.प/न.प.आस्थापना पदोन्नती/प्र.क्र. ४५/कक्ष-४/2109
वरळी, मुंबई-४०० ०३२
दिनांक :-२८.०४.२०२२

## परिपत्रक

नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये प्रचलित अधिनियम/नियम तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयांचे पालन न करता पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे पदोन्नती देण्यास होणारा विलंब हा प्रशासकीय कार्यपध्दतीतील दिरंगाईमुळे होत असल्याने, पदोन्नतीच्या प्रस्तावांचा त्वरेने निपटारा करणेसाठी, तसेच पदोन्नतीबाबतची प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण होऊन पदोन्नतीचा लाभ मिळावा, यासाठी वेळापत्रक निश्चित करणे गरजेचे आहे. त्याकरिता संचालनालयाचे शासनाने वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रक निर्गमित केले आहेत.तसेच संचालनालयाचे यापूर्वीचा स्थायी निर्देश क्रमांक २० निर्गमित करणेत आला आहे. त्याचधर्तीवर राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायतीमधील पदोन्नतीची कार्यपध्दती व वेळापत्रक निश्चित करणे अगत्याचे होते.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यपध्दती व वेळापत्रक निश्चित करणेत येत आहे.

अ) महाराष्ट्र नागरी सेवा नियम हे या संचालनालयाच्या दिनांक १४.०५.१९८४ च्या आदेशान्वये सर्व नगरपरिषदाना लागू केलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवाजेष्ठता विनियम) नियम,१९८२ नुसार नगरपरिषदा /नगरपंचायतींमधील सर्व संवर्गाच्या सेवाज्येष्ठता याद्या प्रतिवर्षी अद्ययावत करून प्रसिध्द करण्याची दक्षता घ्यावी.

ब) नगरपरिषदा/नगरपंचायतीमधील रिक्त पदांचा त्रैमासिक (एप्रिल, जूलै, ऑक्टोंबर व जानेवारी) आढावा घेणे आस्थापना अधिकारी /मुख्याधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.

क) रिक्त पदाच्या अनुषंगाने पदोन्नतीसाठी पात्र कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव नगरपरिषद स्तरावर मागविणे,तसेच गोपनिय अहवाल प्राप्त करून घेणे व पुनर्विलोकन करणेत आले आहे किंवा नाही याची पडताळणी करून पात्र कर्मचाऱ्यांचा प्रस्तावांची यादी तयार करणेत यावी व प्रस्ताव जिल्हा पदोन्नती समितीकडे यावेत.

ड) जिल्हा पदोन्नती समितीने नगरपरिषदांकडून प्रस्ताव प्राप्त होताच पुढील ७ दिवसात पदोन्नती समिती सदस्यांची नावे निश्चित करावीत.

इ) सदस्यांची नावे निर्धारित केल्यानंतर पुढील ३० दिवसात पदोन्नती समितीने प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेऊन नगरपरिषदा /नगरपंचायतीमधील पदोन्नतीसाठी पात्र कर्मचाऱ्यांची नावे /आदेश विनाविलंब निर्गमित करणे तसेच नगरपरिषदेस कळविणे बंधनकारक राहील.

ई) नगरपरिषदेस जिल्हा समितीकडून पात्र कर्मचारी पदोन्नती यांचे नावे समजताच नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी सर्वसाधारण सभेची मंजूरी घेऊन ३० दिवसात पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणे बंधनकारक राहील.

उ) पदोन्नतीसंबंधिचा आढावा बैटका वर्षातून ४ वेळा म्हणजेच एप्रिल, जूलै, ऑक्टोंबर व जानेवारी या महिन्यात घेणे अनिवार्य राहील.

ऊ) तसेच रिक्त पदांचा आढावा घेणेसंबंधी खालीलप्रमाणे स्तर निश्चित करणेत येत आहेत.

| | |
|---|---|
| १) जिल्हा स्तर | - त्रैमासिक |
| २) विभागीय स्तर | - सहामाही |
| ३) संचालनालय स्तर | - वार्षिक |

उपरोक्त नमूद कार्यपध्दतीची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी, जेणेकरून प्रशासकीय कार्यपध्दतीतील दिरंगाई दूर करून पदोन्नतीचे प्रस्ताव जलद गतीने निकाली काढणेस मदत होईल.

(डॉ.किरण कुलकर्णी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,

प्रति,

१) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कोकण, नाशिक,पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
२) सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय(सर्व )
३) मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत (सर्व )
४) निवड नस्ती